# गॉल कसोटीत भारताचा फिरकीचा डाव; तीन डावखुरे खेळणार?

**गॉल, दि. १३ (वृत्तसंस्था) :** भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला शनिवार, १५ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्याच्या दृष्टीने ही मालिका भारतीय संघासाठी महत्त्वाची आहे. गॉलच्या मैदानावर फिरकी गोलंदाजांना मिळणारी संभाव्य मदत लक्षात घेता, पहिल्या कसोटीत भारत तीन फिरकीपटूंसह मैदानात उतरण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि मानव सुथार या तीन डावखुर्या फिरकीपटूंना एकाच सामन्यात खेळवण्याचा पर्याय भारतीय संघ व्यवस्थापनासमोर आहे. कर्णधार शुभमन गिल आणि प्रशिक्षक गौतम गंभीर अंतिम अकराबाबत कोणता निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्न मॉर्केल यांनी तीन डावखुरे फिरकीपटू खेळवण्याच्या शक्यतेचे संकेत दिले आहेत. तिन्ही गोलंदाज डावखुरे असले तरी त्यांच्या गोलंदाजीच्या शैलीत मोठा फरक आहे. कुलदीप यादव आपल्या मनगटी फिरकीच्या माध्यमातून फलंदाजांना चकवण्याची क्षमता राखतो. रवींद्र जडेजा अचूक टप्प्यावर गोलंदाजी करून फलंदाजांवर दबाव निर्माण करण्यात तरबेज आहे. मानव सुथार पारंपरिक डावखुरी फिरकी गोलंदाजीसह चेंडूला अधिक वळण देण्याची क्षमता ठेवतो. त्यामुळे तिघांना एकत्र खेळवणे हा एकाच प्रकारच्या गोलंदाजीवर अवलंबून राहण्याचा निर्णय ठरणार नाही, असे मॉर्केल यांच्या भूमिकेतून स्पष्ट झाले आहे.



कुलदीपच्या अनुभवाला संघासाठी विशेष महत्त्व असल्याचे मॉर्केल यांनी सांगितले. कुलदीप हा आक्रमक गोलंदाज असून त्याचा अनुभव संघासाठी उपयुक्त ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. मानव सुथार चेंडूला अधिक वळण देतो, तर जडेजाची ताकद अचूक गोलंदाजीत आहे. त्यामुळे तीन डावखुरे फिरकीपटू असणे ही चिंतेची बाब नसल्याचे मॉर्केल यांनी नमूद केले. गॉलच्या मैदानाचा इतिहास पाहता तीन फिरकीपटूंना संधी देणे योग्य पर्याय ठरू शकतो, असेही त्यांनी सांगितले. कसोटी जसजशी पुढे सरकेल, तसतशी खेळपट्टीच्या स्वरूपात बदल होण्याची शक्यता असून, त्यानुसार कर्णधार शुभमन गिलला या गोलंदाजांचा वापर करावा लागणार आहे. तिघांकडेही प्रतिस्पर्धी संघाचे २० बळी घेण्याची क्षमता असल्याचा विश्वास मॉर्केल यांनी व्यक्त केला.

दरम्यान, अंतिम अकरामध्ये तीन वेगवान गोलंदाज खेळवायचे की अधिक फिरकीपटूंना संधी द्यायची, याबाबतचा निर्णय खेळपट्टीचा अंदाज घेतल्यानंतर होण्याची शक्यता आहे. वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णा आणि मोहम्मद सिराज यांच्याबाबत मॉर्केल फारसे चिंतित नाहीत. दोघांनीही देशांतर्गत क्रिकेटमध्ये कठीण परिस्थितीत भरपूर क्रिकेट खेळले आहे. मात्र गॉलमधील तीव्र उष्णता, दमट वातावरण आणि कुकाबुरा चेंडू मऊ होणे ही वेगवान गोलंदाजांसाठी आव्हाने ठरू शकतात. त्यामुळे भारताच्या अंतिम अकरामध्ये तीन डावखुरे फिरकीपटू उतरतात का, याकडे पहिल्या कसोटीपूर्वी सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महिला हॉकी विश्वचषकासाठी भारत सज्ज; चीनविरुद्ध १६ ऑगस्टला सलामी



**नवी दिल्ली, दि. १३ (वृत्तसंस्था) :** महिला हॉकी विश्वचषक २०२६ स्पर्धेत भारतीय संघ पदकाच्या लक्ष्याने मैदानात उतरणार आहे. नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे होणाऱ्या या स्पर्धेत भारताचा पहिला सामना १६ ऑगस्टला चीनविरुद्ध होणार आहे. भारतीय संघाने नुकतेच राष्ट्रकपचे विजेतेपद मिळवत आत्मविश्वास उंचावला असून, अनुभवी गोलरक्षक सविता पुनिया यांनी या कामगिरीमुळे जागतिक स्तरावरील सर्वोत्तम संघांना आव्हान देण्याचा विश्वास निर्माण झाल्याचे म्हटले आहे. भारताला या स्पर्धेत चांगली कामगिरी करत पदकाच्या शर्यतीत स्थान मिळवण्याची संधी आहे.

भारताचा समावेश प्राथमिक टप्प्यातील 'ड' गटात करण्यात आला असून, चीन, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका हे अन्य संघ या गटात आहेत. भारताचा चीनविरुद्धचा पहिला सामना १६ ऑगस्टला भारतीय वेळेनुसार सायंकाळी ४.३० वाजता होईल. त्यानंतर १८ ऑगस्टला सायंकाळी ६.३० वाजता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध, तर २० ऑगस्टला याच वेळेत इंग्लंडविरुद्ध भारताचा सामना होणार आहे. प्राथमिक टप्प्यातील कामगिरीनुसार पुढील फेरीसाठी संघांचे गट निश्चित केले जाणार असल्याने भारतासाठी प्रत्येक सामना महत्त्वाचा ठरणार आहे. प्राथमिक टप्प्यानंतर २१ ते २४ ऑगस्टदरम्यान स्पर्धेचा दुसरा टप्पा होईल. या टप्प्यात प्राथमिक गटातील स्थानानुसार संघांची नव्या गटांमध्ये विभागणी केली जाईल. 'ड' गटातील पहिल्या दोन क्रमांकावरील संघांना 'अ' गटातील पहिल्या दोन संघांसोबत 'ई' गटात स्थान मिळेल. या फेरीत संघांना प्राथमिक टप्प्यात न खेळलेल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध दोन सामने खेळावे लागतील. प्राथमिक टप्प्यातील गुण आणि निकाल पुढील फेरीतही ग्राह्य धरले जाणार आहेत. त्यामुळे भारताचे पुढील सामने त्याच्या गटातील स्थानावर अवलंबून असतील.

# स्टार्कचा ऐतिहासिक विक्रम; हेराथला मागे टाकत नंबर वन डावखुरा

**ढाका, दि. १३ (वृत्तसंस्था) :** ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने कसोटी क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत डावखुऱ्या गोलंदाजांमध्ये सर्वाधिक बळी घेण्याचा विश्वविक्रम आपल्या नावावर केला. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी सादमान इस्लामला बाद करत स्टार्कने श्रीलंकेचा माजी फिरकीपटू रंगना हेराथचा ४३३ बळींचा विक्रम मागे टाकला. सादमानची विकेट घेतल्यानंतर स्टार्कच्या कसोटी बळींची संख्या ४३४ झाली. विशेष म्हणजे, १३ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय डावखुरा खेळाडू दिनीच स्टार्कने हा विक्रम केला.



बांगलादेशच्या डावाची सुरुवात सादमान इस्लाम आणि तन्झिद हसन तमीम यांनी केली होती. मात्र नवव्या षटकात स्टार्कने दुसऱ्याच चेंडूवर सादमानला माघारी धाडले. स्टार्कच्या गोलंदाजीवर नॅथन लायनने सादमानचा झेल घेतला. सादमानने ३० चेंडूंचा सामना करत दोन चौकारांच्या मदतीने २० धावा केल्या होत्या. या विकेटसह स्टार्कने ४३४ कसोटी बळींचा टप्पा गाठला आणि डावखुऱ्या गोलंदाजांमध्ये सर्वाधिक बळी घेण्याचा मान मिळवला.

स्टार्कने हेराथला मागे टाकल्यानंतर या यादीत पाकिस्तानचा महान वेगवान गोलंदाज वसीम अक्रम ४१४ बळींसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडचा डॅनियल व्हेटोरी ३६२, श्रीलंकेचा चमिंडा वास ३५५ आणि भारताचा रवींद्र जडेजा ३४८ बळींसह त्यानंतर आहेत. न्यूझीलंडचा ट्रेंट बोल्ट ३१७, ऑस्ट्रेलियाचा मिचेल जॉन्सन ३१३, भारताचा झहीर खान ३११ आणि इंग्लंडचा डेरेक अंडरवुड २९७ बळींसह या यादीत पुढे आहेत.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत भारत-पाकिस्तान सामना पदकापुरताच मर्यादित

**नवी दिल्ली, दि. १३ (वृत्तसंस्था) :** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना होणार की नाही, याबाबतचे चित्र स्पष्ट झाले आहे. जपानमधील नागोया येथे होणाऱ्या या स्पर्धेत दोन्ही कट्टर प्रतिस्पर्धी प्राथमिक टप्प्यात एकमेकांविरुद्ध खेळणार नाहीत. त्यामुळे भारत-पाकिस्तान सामना झाला, तर तो केवळ सुवर्णपदक किंवा कांस्यपदकासाठी होण्याची शक्यता आहे. मात्र दोन्ही संघांच्या स्पर्धेतील प्रवासावर हे समीकरण अवलंबून असल्याने चाहत्यांना पुन्हा एकदा निराश व्हावे लागू शकते. पुरुष क्रिकेट स्पर्धेत भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका यांनी थेट उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले आहे. अफगाणिस्तानसह अन्य सहा संघांना प्रथम गट टप्प्यात खेळावे लागणार आहे. पात्रता फेरीतील 'अ' गटात अफगाणिस्तान, जपान आणि नेपाळ, तर 'ब' गटात हाँगकाँग, मलेशिया आणि ओमान यांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील संघ एकमेकांविरुद्ध सामने खेळतील आणि दोन्ही गटांतील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील.ड्रॉनुसार भारताला दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत, तर पाकिस्तानला पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान देण्यात आले आहे. दोन्ही उपांत्यपूर्व फेरीचे सामने २८ सप्टेंबरला होणार आहेत.

# 'दशमी'मधून अन्यायाविरोधातील संघर्षाची कथा; ऑक्टोबरमध्ये चित्रपट प्रदर्शित

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) :** विजयादशमीच्या पारंपरिक संकल्पनेला आधुनिक सामाजिक वास्तवाची जोड देणारा 'दशमी' हा नवा मराठी चित्रपट ऑक्टोबरमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. केएनके बॉक्स प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांनी केले आहे. विजय, संघर्ष आणि स्त्रीशक्ती यांची सांगड घालत अन्यायाविरोधात उभे राहण्याचा संदेश चित्रपटातून मांडण्यात आला आहे. चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरचे नुकतेच अनावरण करण्यात आले. विजयादशमी हा केवळ सण नसून सत्याचा असत्यावर, धर्माचा अधर्मावर आणि न्यायाचा अन्यायावर विजय मिळवून देणाऱ्या विचारांचा उत्सव आहे. याच संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून 'दशमी'ची कथा साकारण्यात आली आहे. विशेषतः मुली आणि कुटुंबांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याबरोबरच प्रत्येक व्यक्तीला अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे बळ देणारा विचार चित्रपटातून मांडण्यात आल्याचे दिग्दर्शक योगेश पांडुरंग भोसले यांनी सांगितले. 'दशमी'मध्ये महेश मांजरेकर, मकरंद अनासपुरे, विजय निकम, गौरी इंगवले, प्रसन्न केतकर, देवेंद्र गायकवाड, शाम माशाळकर, राज कुंदन आणि दाक्षिणात्य अभिनेते रवि प्रकाश यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

---

**अवसायक**

**दि सिकेपी को-ऑप. बँक लि., (अवसायनात)**

६६/६७, विजय नगर बिल्डिंग, दुसरा मजला, एम.सी. जावळे मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८ दुरध्वनी क्रमांक - ९३२१६२८९१५

ईमेल: ckpbanksro@gmail.com /ckpbankheadoffice@gmail.com

**-: ई लिलावाद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर सूचना :-**

मी, अवसायक, दि सिकेपी को-ऑप. बँक लि. (अवसायनात) जाहीर नोटीसीद्वारे सूचना प्रसिध्द करतों कि, दि सीकेपी को-ऑप. बँक लि., (अवसायनात) बँकेने थकबाकीदार मे रेवती डेव्हलपरर्स या कर्जदारावर कारवाई करुन त्यांची जप्त केलेली फ्लॅट नं १२०१, १२ वा मजला, फ्लॅट नं.१३०१, १३ वा मजला, प्राईम रोझ टॉवर, स्वरूप को-ऑप हौ सो लि., विरा देसाई रोड, आंबोली, अंधेरी (प) मुंबई-४०००५८ ई-लिलावाद्वारे जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे आणि जे काही आहे तेथे आहे या तत्वाने दिनांक १४.०८.२०२६ रोजी जाहीर लिलावाची तारीख होती. सदर जाहिर लिलावाची तारीख पुढे ढकलण्यात येत असून दिनांक ०२.०९.२०२६ रोजी https://eauction.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून सकाळी १०.०० ते संध्याकाळी १७.०० या वेळेत होईल. सदर जाहीर लिलावा संदर्भातील तारखा https://eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. लिलावातील बोलीदारांची पुर्वपात्रता, इसारा अनामत, लिलाव फी, इतर अटी शर्ती पुर्वीप्रामाणेच कायम राहतील याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४.०८.२०२६
ठिकाण : मुंबई

आनंद कटके
अवसायक
दि सीकेपी को-ऑप. बँक लि. (अवसायनात)

---

**अंधेरी पश्चिम शाखा**
युनिट क्र.२५,२६ व २७, लक्ष्मी प्लाझा,
लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड,
अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३.
**ई-मेल:** mumbaiandheriwest@tmbank.in
**दूरध्वनी:** ०२२ २६३६६२४०/२६३६६२६०
सीआयएनः एल६५११०टीएन१९२१पीएलसी००१९०८

TMB Tamilnad Mercantile Bank Ltd
Be a step ahead in life

**परिशिष्ट IV-A [नियम ८(६) मधील परंतुक पहा]**
**अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ चे नियम ८ (६) आणि ९ (१) च्या परंतुकासह वाचित सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनांशियल असेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार(कर्जदारांना) व हमीदार(हमीदारांना) सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या सुरक्षित धनकोकडे गहाण/भारित केलेल्या अचल मालमत्ता, ज्यांचा रचनात्मक ताबा तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, अंधेरी पश्चिम शाखेच्या (सुरक्षित धनको) अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, त्या "ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत", **"जसे आहे ते तसे" आणि "जे काही आहे ते"** या तत्त्वावर **०९.०९.२०२६ रोजी** तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, अंधेरी पश्चिम शाखा (सुरक्षित धनको) यांना **३१.०७.२०२६ रोजी देय असलेल्या रु. ६५,७३,८४२.११ (रुपये पासष्ट लाख त्र्याहत्तर हजार आठशे बेचाळीस आणि अकरा पैसे फक्त)** रकमेच्या वसुलीसाठी, त्यावरील त्यानंतरचे व्याज आणि खर्चासह, **मे. आशा एंटरप्राइजेसच्या मालकीण श्रीमती आशा केतन पांचाळ, स्व. केतन पांचाळ यांच्या पत्नी, हमीदार स्व. केतन शांबूलाल पांचाळ, कायदेशीर वारस श्रीमती आशा केतन पांचाळ, श्री श्लोक केतन पांचाळ आणि कु. जाना केतन पांचाळ यांच्याकडून विकल्या जातील. राखीव किंमत रु. ५५,८९,०००/- असेल आणि इसारा रक्कम रु. ५,५८,९००/- असेल.**

**लिलावाचे ठिकाण :**
**तामिळनाड मर्कंटाईल बँक**
अंधेरी पश्चिम शाखा युनिट क्र.२५,२६ व २७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३. ई-मेल: mumbai_andheriwest@tmbank.in
दूरध्वनी: ०२२ २६३६६२४०/२६३६६२६० मोबाईल क्र.९८७०९८९११८

**लिलाव विक्रीची तारीख व वेळ : ०९.०९.२०२६ रोजी दु. ३.०० वा.**

**मालमत्तेचे वर्णन:**
न्याय्य गहाणाच्या विस्तारावर निवासी सदनिका क्र.३०३, क्षेत्रफळ ४२३ चौ. फूट म्हणजेच ३९.२९ चौ. मी. कार्पेट क्षेत्रफळ आणि खुली टेरेस १२६ चौ. फूट म्हणजेच ११.७० चौ. मी. क्षेत्रफळ (करारानुसार), एकूण कार्पेट क्षेत्रफळ-५३३.५९ चौ. फूट (प्रत्यक्षानुसार), तिसरा मजला, 'सी' विंग, "श्री शिव सागर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड" म्हणून ओळखली जाणारी इमारत, प्लॉट क्र. ए-८, सेक्टर ७, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (पश्चिम), तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१०२०६, श्री केतन पांचाळ यांच्या नावावर असलेली.
सीमाः उत्तरः प्लॉट क्र. ए-९, दक्षिणः प्लॉट क्र. ए-७, पूर्वः १३ मीटर रस्ता, पश्चिमः प्लॉट क्र. ए-३२

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी सुरक्षित धनकोच्या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकचा www.tmb.in संदर्भ घ्यावा.

**ठिकाणः अंधेरी पश्चिम**
**तारीखः १३.०८.२०२६**

**अधिकृत अधिकारी**
**तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड**
**अंधेरी पश्चिम शाखा**

---

## अग्रवाल इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेड

AGARWAL GROUP

नोंदणीकृत कार्यालयः युनिट २०१-२०२, ईस्टर्न कोर्ट, व्ही एन पुरव मार्ग, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.
दूरध्वनी क्र.: ०२२-२५२९११४९/५०. फॅक्सः ०२२-२५२९११४७ सीआयएन : L99999MH1995PLC084618 वेबसाईटः www.aicltd.in, ई-मेलः contact@aicltd.in

**३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरीक्षित स्टँडअलोन आणि एकत्रित वित्तीय निकालांचा उतारा**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | स्टँडअलोन | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही ३० जून २०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३१ मार्च २०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३० जून २०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३० जून २०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३१ मार्च २०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३० जून २०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१ मार्च २०२६ (लेखापरीक्षित) |
| १ | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | ३४,१९३.७३ | ३३,५७९.०६ | ५१,२३७.६९ | १३५,४३१.६१ | ४३,६०६.७५ | ४१,१७४.८८ | ५९,५३०.७७ | १६६,९८३.१६ |
| २ | या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक बाबींपूर्वी) | १,२४२.४० | १,७७८.१२ | १,३५३.६२ | ४,६१५.६९ | १,३५८.५३ | २,०४०.७२ | १,६६२.५९ | ५,५२५.३४ |
| ३ | करापूर्वी या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,२४२.४० | १,७७८.१२ | १,३५३.६२ | ४,६१५.६९ | १,३५८.५३ | २,०४०.७२ | १,६६२.५९ | ५,५२५.३४ |
| ४ | करानंतर या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ९१९.३८ | १,३२२.४५ | १,००५.४० | ३,४४३.५४ | १,०३४.९२ | १,५७४.८० | १,३०३.०१ | ४,३५६.५५ |
| ५ | या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [या कालावधीसाठीचा नफा / (तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट] | ९१९.३८ | १,३२२.४५ | १,००५.४० | ३,४४८.३० | १,२६७.७७ | २,६८५.४५ | १,३५१.८२ | ६,६८५.१७ |
| ६ | इक्विटी शेअर भांडवल | १,४९५.७८ | १,४९५.७८ | १,४९५.७८ | १,४९५.७८ | १,४९५.७८ | १,४९५.७८ | १,४९५.७८ | १,४९५.७८ |
| ७ | मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | - | ४०,७३३.७३ | - | ४०,७३३.७३ | - | ६७,४०५.२७ | - | ६७,४०५.२७ |
| ८ | प्रति शेअर मिळकत (प्रत्येकी रु. १०/- ची) (सुरू असलेल्या आणि खंडित ऑपरेशन्ससाठी) | | | | | | | | |
| | १. मूळ (रु.): | ६.१५ | ८.८४ | ६.७२ | २३.०२ | ६.९२ | १०.५३ | ८.७१ | २९.१३ |
| | २. सौम्यकृत (रु.): | ६.१५ | ८.८४ | ६.७२ | २३.०२ | ६.९२ | १०.५३ | ८.७१ | २९.१३ |

टीपाः
१. सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ आणि त्याअंतर्गत वेळोवेळी जारी केलेल्या विविध परिपत्रकांनुसार तयार करण्यात आलेले, अग्रवाल इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेड ("कंपनी") चे ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीचे वरील अलेखापरीक्षित वित्तीय निकाल (स्टँडअलोन आणि एकत्रित) लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहेत आणि संचालक मंडळाने आज म्हणजे १३ ऑगस्ट २०२६ रोजी मंजूर केले आहेत. हे वित्तीय निकाल कंपनीच्या आणि स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.
२. हे वित्तीय निकाल कंपनी (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ (२०१६ च्या सुधारित नियमांनुसार) द्वारे अधिसूचित इंड एएस नुसार तयार करण्यात आले आहेत.
३. अग्रवाल इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या वरील अलेखापरीक्षित वित्तीय निकालांमध्ये (एकत्रित) खालील पूर्ण मालकीच्या उपकंपन्यांच्या (डब्ल्यूओएस) निकालांचा समावेश आहे - (i) बिटुमिनेक्स कोचीन प्रायव्हेट लिमिटेड, (ii) एआयसीएल ओव्हरसीज एफझेड-एलएलसी (iii) अग्रवाल ट्रान्सलिंक प्रायव्हेट लिमिटेड (iv) एआयसीएल फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडचे पूर्व-कार्यकारी निकाल आणि (v) कोकण स्टोरेज सिस्टीम्स (कारवार) प्रायव्हेट लिमिटेड.
४. मेसर्स आरकेसीआयपीएल करमाळा टेंभुर्णी हायवेज प्रायव्हेट लिमिटेड, एक सहयोगी कंपनी जिचा मुख्य व्यवसाय एनएचएआयच्या रस्ते बांधकाम निविदांमध्ये भाग घेणे हा आहे, तिने अद्याप आपले व्यावसायिक कामकाज सुरू केलेले नाही.
५. कंपनी प्रामुख्याने सहायक पायाभूत सुविधा उद्योगाशी संबंधित आहे आणि (i) पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या बिटुमेन आणि संबंधित उत्पादनांचे उत्पादन आणि व्यापार, (ii) स्वतःच्या विशेष टँकर्सद्वारे बल्क बिटुमेन आणि एलपीजीसाठी लॉजिस्टिक्स प्रदान करणे आणि (iii) पवनचक्कीद्वारे वीज निर्मिती करणे या व्यवसायात गुंतलेली आहे. हे व्यवसाय हंगामी स्वरूपाचे असल्याने महसुलात बदल होतो. कंपनीचे उत्पादन युनिट तळोजा, बेळगाव, बडोदा, हैदराबाद, कोचीन (तिची पूर्ण मालकीची उपकंपनी - बिटुमिनेक्स कोचीन प्रायव्हेट लिमिटेड द्वारे), रंगिया (जि. कामरूप, आसाम) आणि पचपदरा शहर (जि. बाडमेर, राजस्थान) येथे आहेत आणि लिक्विड बल्क स्टोरेज/टर्मिनल सुविधा मंगळूर, बडोदा, दिघी आणि तळोजा येथे आहेत. याव्यतिरिक्त, कंपनीच्या आउटसोर्स स्टोरेज सुविधा कारवार आणि हल्दिया येथे आहेत.
६. कंपनीची भारतीय पूर्ण मालकीची उपकंपनी - बिटुमिनेक्स कोचीन प्रायव्हेट लिमिटेड देखील बिटुमेन आणि बिटुमिनस उत्पादनांचे उत्पादन आणि व्यापार या व्यवसायात आहे, तर तिची परदेशी पूर्ण मालकीची उपकंपनी - एआयसीएल ओव्हरसीज एफझेड- एलएलसी, रास अल खैमाह, युएई ही जहाज ऑपरेशन्सच्या व्यवसायात आहे आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वेळोवेळी जारी केलेल्या ओव्हरसीज डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट्स (ओडीआय) मार्गदर्शक तत्त्वांनुसार आपले व्यावसायिक कार्य करत आहे. अग्रवाल ट्रान्सलिंक प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनीची आणखी एक भारतीय पूर्ण मालकीची उपकंपनी आहे जी बिटुमेन, एलएसएचएसच्या वाहतुकीच्या व्यवसायात गुंतलेली आहे आणि तिच्याकडे विशेष बिटुमेन टँकर्सचा मोठा ताफा आहे आणि ती शहापूर, आसनगाव, महाराष्ट्र येथे बीपीसीएल पेट्रोल पंप देखील चालवते. तसेच, कंपनीची पूर्ण मालकीची उपकंपनी - एआयसीएल फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड, एक एनबीएफसी (नॉन-डिपॉझिट) कंपनीच्या स्थितीबाबत, नियामक परवानग्या/परवान्यांमुळे तिने अद्याप आपला व्यवसाय सुरू केलेला नाही. कंपनीने नव्याने अधिग्रहित केलेली पूर्ण मालकीची उपकंपनी - कोकण स्टोरेज सिस्टीम्स (कारवार) प्रायव्हेट लिमिटेडकडे कारवार येथे स्वतःच्या लिक्विड बल्क स्टोरेज सुविधा/टर्मिनल्स आहेत.
७. पुनरावलोकनाधीन कालावधीत, मध्यपूर्वेतील युद्धामुळे पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि अस्थिर कार्य वातावरण तसेच सध्याच्या जागतिक भू-राजकीय अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या महत्त्वपूर्ण आव्हानांचा समूहाच्या व्यावसायिक कामकाजाला सामना करावा लागला. या बाह्य घटकांमुळे इनपुट खर्चात वाढ झाली, पुरवठ्याला मर्यादा आल्या आणि उद्योगातील स्पर्धा तीव्र झाली, ज्यामुळे बाजारातील किंमती, मार्जिन आणि समूहाच्या एकूण नफ्यावर परिणाम झाला. या आव्हानात्मक परिस्थितीला न जुमानता, समूहाने प्रभावी खर्च व्यवस्थापन, कार्यक्षमता आणि संसाधनांच्या इष्टतमीकरणासाठी योग्य उपाययोजना स्वीकारणे सुरू ठेवले. या बाह्य आव्हानांचा समर्थपणे सामना करण्यासाठी आणि आगामी काळात शाश्वत वाढ व सुधारित नफा मिळवण्यासाठी समूह वचनबद्ध आहे.
८. पुनरावलोकनाधीन कालावधीत, प्रामुख्याने मध्यपूर्वेतील युद्धामुळे निर्माण झालेले जागतिक भू-राजकीय दृश्य आणि पुरवठ्यातील अनिश्चितता यामुळे कंपनीच्या व्यावसायिक कामकाजावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, ज्याचा उद्योगातील स्पर्धात्मकता, किंमतीची चौकट आणि कंपनीच्या एकूण नफ्यावरही वाईट परिणाम झाला आहे.
९. चालू आणि मागील कालावधी/वर्षांसाठी मूळ आणि सौम्यकृत प्रति शेअर मिळकत (ईपीएस) इंड एएस-३३ नुसार मोजण्यात आली आहे.
१०. पुनरावलोकनाधीन कालावधीत कंपनीने आपले कोणतेही कामकाज खंडित केलेले नाही.
११. चालू कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत करण्यासाठी मागील कालावधीचे आकडे आवश्यक तेथे पुनर्रचित/पुनर्वर्गीकृत केले आहेत.
१२. पुनरावलोकनाधीन कालावधीत कंपनीने आपले कोणतेही कामकाज खंडित केलेले नाही. (टीप क्र. १० ची पुनरावृत्ती)
१३. चालू कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत करण्यासाठी मागील कालावधीचे आकडे आवश्यक तेथे पुनर्रचित/पुनर्वर्गीकृत केले आहेत. (टीप क्र. ११ ची पुनरावृत्ती)
१४. कंपनी आणि तिच्या उपकंपन्यांचे ऑपरेशन्स आणि नफा उद्योगाच्या कल/नियमांनुसार आहेत. आगामी काळात समूहाची आर्थिक कामगिरी सुधारण्यासाठी व्यवस्थापन अधिक चांगल्या ऑपरेशन्सवर लक्ष केंद्रित करत आहे.

ठिकाणः मुंबई
दिनांकः १३ ऑगस्ट, २०२६

अग्रवाल इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेड करिता
सही/-
ललित अग्रवाल
पूर्णवेळ संचालक
डीआयएन क्र.: ०१३३५१०७

---

alicon
Casting The Future

## अलिकॉन कास्टॅलॉय लिमिटेड

सीआयएनः L99999PN1990PLC059487
नोंदणीकृत कार्यालय व कारखानाः गट क्र. १४२६, शिखरापूर, तालुका - शिरूर, जिल्हा - पुणे - ४१२ २०८.
वेबसाईटः www.alicongroup.co.in ई-मेलः cs@alicongroup.co.in

**३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी स्टँडअलोन आणि एकत्रित आर्थिक निकालांचे विवरण**

(रक्कम रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | स्टँडअलोनः संपलेली तिमाही ३० जून, २०२६ (अलेखापरीक्षित) | स्टँडअलोनः संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२६ (लेखापरीक्षित) | स्टँडअलोनः संपलेली तिमाही ३० जून, २०२५ (अलेखापरीक्षित) | स्टँडअलोनः संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२६ (लेखापरीक्षित) | एकत्रितः संपलेली तिमाही ३० जून, २०२६ (अलेखापरीक्षित) | एकत्रितः संपलेली तिमाही ३० जून, २०२५ (अलेखापरीक्षित) | एकत्रितः संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२६ (लेखापरीक्षित) | एकत्रितः संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२६ (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न (विक्री / ऑपरेशन्समधून उत्पन्न) | ५६,१४५.७० | ४७,२२४.६४ | ३९,१५५.३९ | १६६,९३९.६२ | ५७,९०६.२९ | ४९,५४४.३७ | ४२,११९.७० | १७८,४४६.८९ |
| २ | या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा विशेष बाबींपूर्वी) | २,४४७.१३ | ९७४.३४ | १,४७०.१२ | ५,२६०.३८ | १,८२६.१७ | ९९१.१४ | १,५१५.६९ | ५,४६९.७५ |
| ३ | या कालावधीसाठी करापूर्वीचा निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींनंतर) | २,४४७.१३ | ९७४.३४ | १,२१३.४९ | ४,५०३.६६ | १,८२६.१७ | ९९१.१४ | १,२५९.०६ | ४,७१३.०३ |
| ४ | या कालावधीसाठी करानंतरचा निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींनंतर) | १,७६५.५४ | ७०६.३६ | ८९७.२१ | ३,२८६.७२ | १,१४४.५८ | ७९३.९१ | ९३१.३६ | ३,४४३.७५ |
| ५ | या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [या कालावधीसाठी नफा / (तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) मिळून] | १,७३१.८० | ४३५.२२ | ८४७.३२ | ३,०४३.३६ | ९८३.६५ | ८१६.०७ | १,२९७.६६ | ४,२२२.७३ |
| ६ | इक्विटी शेअर भांडवल | ८२०.५९ | ८१६.८४ | ८१६.८४ | ८१६.८४ | ८२०.५९ | ८१६.८४ | ८१६.८४ | ८१६.८४ |
| ७ | प्रति शेअर उत्पन्न (प्रत्येकी रु. ५/- चे) (ईपीएस वार्षिकृत केलेले नाही): | | | | | | | | |
| | १) मूळः | १०.८२ | ४.३२ | ५.५० | २०.१२ | ७.०२ | ४.८६ | ५.७१ | २१.०९ |
| | २) सौम्यकृतः | १०.८२ | ४.३० | ५.४८ | २०.०३ | ७.०२ | ४.८४ | ५.६९ | २१.०१ |

टीपाः
१. कंपनी केवळ एकाच विभागात कार्यरत आहे, म्हणजेच अल्युमिनियम कास्टिंग्ज.
२. हे विवरण कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत निर्धारित कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्ड्स) नियम, २०१५ (इंड-एएस) आणि लागू असलेल्या इतर मान्यताप्राप्त लेखा पद्धती व धोरणांच्या अनुषंगाने तयार करण्यात आले आहे.
३. वरील निकालांचे ऑडिट कमिटीने पुनरावलोकन केले आहे आणि अनुक्रमे १२ आणि १३ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या बैठकांमध्ये संचालक मंडळाने त्यांना मान्यता दिली आहे.
४. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या पूर्ण आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित आकडेवारी आणि मागील आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरपर्यंतच्या प्रकाशित अलेखापरीक्षित वर्षाखेरपर्यंतच्या आकडेवारी (ज्यांचे लिस्टिंग रेग्युलेशन्स अंतर्गत आवश्यकतेनुसार मर्यादित पुनरावलोकन करण्यात आले होते) यांच्यातील बॅलन्सिंग आकडे आहेत.
५. अ) २१ नोव्हेंबर, २०२५ रोजी, भारत सरकारने २९ विद्यमान श्रम कायद्यांचे समत्रीकरण करून चार श्रम संहिता अधिसूचित केल्या. उपलब्ध सर्वोत्तम माहितीच्या आधारावर कंपनीने या बदलांच्या प्रभावाचे मूल्यांकन करून तो जाहीर केला आहे. "वेतन व्याख्येत" झालेल्या बदलांमुळे, ग्रॅच्युइटी आणि भरपाई रजा संबंधित ५००.०९ लाखांचा प्रभाव ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि कालावधीसाठी "अपवादात्मक बाबी" अंतर्गत नोंदवण्यात आला आणि उघड करण्यात आला आहे. केंद्रीय द्वारे ९ मे, २०२६ रोजी श्रम संहितेअंतर्गत नियम अधिसूचित केल्यानंतर, कंपनी सध्या त्याच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेत आहे आणि अशा मूल्यांकनाच्या निकालाच्या आधारावर, जर काही असेल तर त्याची नोंद केली जाईल.
ब) जून २५ तिमाहीदरम्यान विक्री कमिशनशी संबंधित मागील कायदेशीर दाव्याच्या सेटलमेंटशी संबंधित २५६.६३ लाख रुपये रक्कम अपवादात्मक बाब म्हणून मान्यताप्राप्त करण्यात आली आहे. हा एकरकमी खर्च असून याचा कंपनीच्या कामकाजावर कोणताही चालू प्रभाव पडत नाही.
६. तुलना करणे सोपे जावे यासाठी आवश्यकतेनुसार मागील आकडे पुनर्रचित करण्यात आले आहेत.

ठिकाणः पुणे
दिनांकः १३ ऑगस्ट, २०२६

अलिकॉन कास्टॅलॉय लिमिटेड करिता
सही/-
एस. राय
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः 00050950

---

## आरआरपी सेमीकंडक्टर लिमिटेड

(सीआयएनः L46521MH1980PLC022672)
**नोंदणीकृत कार्यालयः** ए३९६/३९७, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, ठाणे, महाराष्ट्र, भारत, ४००७१०
**ईमेल आयडीः** gdtal2000@gmail.com **वेबसाईटः** www.gdtal.com **संपर्क क्र.:** ९२२३४००४३४

**३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरीक्षित वित्तीय निकाल**

| तपशील | स्टँडअलोन (रु. लाखांत) | | | |
|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३०.०६.२०२६ | संपलेली तिमाही ३०.०६.२०२५ | संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ |
| ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | - | - | - | (६८२.१४) |
| करापूर्वीच्या साधारण कामकाजातून निव्वळ नफा / (तोटा) | (१०.९१) | (२८.८३) | (१७.८६) | (७७५.६७) |
| करानंतरच्या साधारण कामकाजातून निव्वळ नफा / (तोटा) | (३२.८९) | (२८.८३) | (१७.८६) | (७७५.६७) |
| करापूर्वी या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | (३२.८९) | (२८.८३) | (१७.८६) | (७७५.६७) |
| करानंतर या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | (३२.८९) | (२८.८३) | (१७.८६) | (७७५.६७) |
| भरणा झालेले इक्विटी शेअर भांडवल (प्रत्येक इक्विटी शेअरचे दर्शनी मूल्य रु. १०/-) | १,३६२.४० | १,३६२.४० | १,३६२.४० | १,३६२.४० |
| राखीव निधी (मागील वर्षाच्या ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | (५३०.४५) | २४९.२८ | २७८.११ | (४९७.५६) |
| प्रति शेअर मिळकत (अपवादात्मक बाबींपूर्वी) (प्रत्येकी रु. १०/- ची) | | | | |
| मूळ : | (०.२४) | (०.२१) | (०.१३) | (५.६९) |
| सौम्यकृतः | (०.२४) | (०.२१) | (०.१३) | (५.६९) |
| प्रति शेअर मिळकत (अपवादात्मक बाबींनंतर) (प्रत्येकी रु. १०/- ची) | | | | |
| मूळः | (०.२४) | (०.२१) | (०.१३) | (५.६९) |
| सौम्यकृतः | (०.२४) | (०.२१) | (०.१३) | (५.६९) |

**टीपाः**
१) आवश्यकतेनुसार मागील वर्षाचे/कालावधीचे आकडे पुनर्रचित/पुनर्वर्गीकृत करण्यात आले आहेत.
२) वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि १३ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकीत संचालक मंडळाने त्यांना मान्यता दिली आहे. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या निकालांचे लेखापरीक्षकांद्वारे मर्यादित पुनरावलोकन करण्यात आले आहे.
३) कंपनी केवळ एकाच विभागात कार्यरत आहे आणि त्यामुळे 'इंड एएस १०८' "ऑपरेटिंग सेगमेंट* नुसार प्रकटीकरण आवश्यक नाही.

ठिकाणः मुंबई
दिनांकः १३-०८-२०२६

आरआरपी सेमीकंडक्टर लिमिटेड करिता,
(पूर्वीची जीडी ट्रेडिंग अँड एजन्सीज लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)
सही/-
मानस रंजन पालो
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०१९३३९९४

प्रातःकाल मल्टीमीडीया लिमिटेडसाठी मुद्रक आणि प्रकाशक महीप गोयल यांनी हे दैनिक दांगट मीडिया प्रायवेट लिमिटेड, २२, दीघे एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, दीघे, नवी मुंबई - ४००७०८ येथे छापून ३३३, लक्ष्मी प्लाजा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई- ४०००५३ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महीप गोयल. आरएनआयक्रमांक- MAHMAR/२०१४/५७२६० दूरध्वनी- २६३१९९२६ ई मेल- pratahkalmarathi@gmail.com